# नागरबाई शिंदे यांना राजमाता जिजाऊ पुरस्कार



कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मातोश्री श्रीमती नागरबाई बाबुराव शिंदे यांना उस्मानाबाद येथील मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समितीतर्फे राजमाता जिजाऊ पुरस्कार जाहीर झाला आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरवही करण्यात येतो. मूळच्या शिंगोली (ता. जि. उस्मानाबाद) येथील असलेल्या श्रीमती शिंदे यांनी प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करीत मुलास उत्तम शिक्षण देऊन कुलगुरू पदापर्यंत पोहोचण्याच्या योग्यतेचे बनविले. त्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार असल्याचे समितीचे अध्यक्ष खंडू भारतराव राऊत यांनी सांगितले.

# समीक्षकांनी मराठी वाङ्‌मयाची पुनर्बांधणी करावी

## ज्येष्ठ समीक्षक सुधीर रसाळ यांची अपेक्षा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'जागतिक स्तरावर भाषिक देवाणघेवाण होण्यासाठी भारतीय साहित्य संकल्पनांचे आस्तित्व मराठी साहित्यात आले पाहिजे. यासाठी मराठी साहित्यातील समीक्षकांच्या नव्या पिढीने मराठी वाङ्मयाची पुनर्बांधणी करणे गरजेचे आहे,' अशी अपेक्षा ज्येष्ठ समीक्षक सुधीर रसाळ यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठ व म.सु.पाटील कुटुंबीयांच्यावतीने यंदाचा पहिलाच, डॉ.म.सु.पाटील समीक्षा पुरस्कार सुधीर रसाळ यांना प्रदान करण्यात आला. साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष वसंत डहाके यांच्या हस्ते रसाळ यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी पुरस्कार स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना रसाळ बोलत होते. सन्मानचिन्ह, मानपत्र व रोख ५१ हजार रूपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शुक्रवारी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के होते.



शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक सुधीर रसाळ यांना देताना साहित्यिक वसंत डहाके.डावीकडून डॉ. रणधीर शिंदे, कवयित्री नीरजा, डॉ. डी. टी. शिर्के, राजन गवस, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, नंदकुमार मोरे.

रसाळ म्हणाले, 'म.सु.पाटील यांच्या नावाने पुरस्कार स्वीकारतानाचा आनंद व त्यांची उणीव अशा संमिश्र भावना आहेत. समीक्षेसारख्या साहित्यातील प्रसिद्धीवलयापासून अलिप्त असलेल्या साहित्यप्रकारात काम करत असताना या क्षेत्रात अपेक्षित प्रगती न झाल्याची खंत आहे. समीक्षा साहित्य प्रकार जेमतेम दीडशे वर्षांचा आहे. या साहित्यप्रकाराला दीर्घ परंपरा नाही. मात्र या काळात समीक्षेमध्ये भरीव काम होण्यासाठी फारसे प्रयत्न गेल्या पिढीतल्या समीक्षकांकडून झाले नाहीत. सैद्धांतिक समीक्षा हा तर दूर पण प्राथमिक समीक्षेतही प्रयोगशील काम होणे अपेक्षित आहे. हा बदल नव्या पिढीतील समीक्षकांनी करावा.'

वसंत डहाके म्हणाले, 'समीक्षा या साहित्यप्रकाराचे वैभव वाढवणारा हा पुरस्कार आहे. समीक्षक हा केवळ त्या साहित्यकृतीचे समीक्षण करत नसतो तर तो त्या साहित्यकृती येणाऱ्या समाजाच्या जीवनशैलीचेही समीक्षण करत असतो. त्यामुळे समीक्षक हा खऱ्या अर्थाने समाज समीक्षक असतो. समीक्षेमध्ये भारतीय साहित्य शास्त्रातील सिद्धांत येत असल्याने वाचकांना साहित्याचे आकलन समजून घेणे शक्य होते.'

अध्यक्षीय समारोप डॉ.डी.टी. शिर्के यांनी केला. म.सु.पाटील यांच्या कन्या कवयित्री नीरजा यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राजन गवस यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, व्ही.टी.पाटील, डॉ.रणधीर शिंदे, डॉ.नंदकुमार मोरे आदींसह मराठी साहित्यक्षेत्रातील मान्यवर, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.

### शिवाजी विद्यापीठच का?

म.सु.पाटील हे मूळचे मनमाडचे. नोकरी व साहित्यलेखन यानिमित्ताने ते मुंबईत स्थायिक झाले. मात्र त्यांच्या नावाने देण्यात आलेल्या पहिल्या पुरस्काराचा सोहळा व पुरस्कारासाठी निधीची रक्कम देण्यासाठी पाटील यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठाची निवड का केली याचा खुलासा नीरजा यांनी केला. पाटील यांनी नोकरीसाठी पहिली मुलाखत शिवाजी विद्यापीठात दिली. तसेच संशोधन व साहित्यातील प्रयोग या धर्तीवर शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे काम अत्यंत स्तुत्य असल्याने आम्ही शिवाजी विद्यापीठाकडे या पुरस्काराची जबाबदारी सोपवल्याचेही नीरजा यांनी सांगितले.

# साहित्यात समीक्षेचे काम जोमाने व्हावे

## ज्येष्ठ साहित्यिक वसंत डहाके; ज्येष्ठ समीक्षक डॉ. रसाळ यांचा म. सु. पाटील पुरस्काराने गौरव

कोल्हापूर, ता. १७ : मराठी साहित्यातील समीक्षकांची प्रजाती नष्ट होत असल्याची स्थिती आहे. समीक्षेचे काम जोमाने होणे आवश्यक असून, ते मराठी साहित्य विचाराला दिशा देणारे ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक वसंत डहाके यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे पहिल्या ज्येष्ठ समीक्षक म. सु. पाटील पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. त्यांच्या हस्ते ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना पुरस्कार प्रदान केला. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व ५१ हजार रुपये असे त्याचे स्वरूप होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे पहिला ज्येष्ठ समीक्षक म. सु. पाटील पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक वसंत डहाके यांच्या हस्ते ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना देण्यात आला. शेजारी डावीकडून प्रा. डॉ. रणधीर शिंदे, नीरजा, सुमती रसाळ, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. राजन गवस, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे.**

श्री. डहाके म्हणाले, ''इतिहास व संस्कृतीत मानव समूहाचे चित्रण असते. त्याचे आकलन असणे आवश्यक आहे. येथे इतिहास याचा अर्थ मानवाच्या जगण्याचे विविध पैलू, शास्त्र, ज्ञान असा असून ते समीक्षकाला माहीत असावे लागते. साहित्यकृती का घडते, त्यातील राजकारण कोणते, या गोष्टी भेडसावणारा सध्याचा काळ आहे. नेमकी वाङ्मयीन कलाकृती कोणती, हे कळण्यासाठी अन्य शास्त्रांची मदत लागते.''

श्री. रसाळ म्हणाले, ''ब्रिटिशांचे आगमन मराठी वाङ्मयाला उद्ध्वस्त करणारे आहे. त्याच्या पुर्नबांधणीची वेळ आली आहे. मराठी समीक्षेला दीर्घ परंपरा नाही. मूल्यमापनात्मक समीक्षा व वाङ्मयीन अभ्यास भिन्न विषय असून, लेखकांच्या समग्र वाङ्मयावर अभ्यास केला का, हे तपासण्याची वेळ आहे. समाज व वाङ्मय नात्याचा अभ्यास, नवकवितेची व्याख्या, नवकथा व नवकविता यांच्यातील नातं याचा शोध घेता आला नाही. त्याची खंत वाटते. निधर्मी वाङ्मयाशी नाते जोडायला हवे होते.''

कसदार लेखक डॉ. राजन गवस यांनी जुन्या पिढीतील साहित्यिकांची समीक्षेतील पावले गडद असल्याचे सांगितले. लेखिका नीरजा यांनी म. सु. पाटील यांच्याविषयीची कविता सादर केली. या प्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते. प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

### देवाण-घेवाण व्हावी

डॉ. रसाळ यांनी आर्थिक वृद्धीसाठी पंचवार्षिक योजना असते. सांस्कृतिक पातळीवर तसा आराखडा नाही. त्याला माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू अपवाद ठरले, असे सांगितले. तसेच भाषिक देवाण-घेवाण संकल्पना भारतीय साहित्यात उतरायला हवी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.